वर्ष : ०५ | अंक: १२ | मुंबई, मंगळवार १२ फेब्रुवारी २०१९ ते १८ फेब्रुवारी २०१९ | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 महापौर बंगल्यासाठी जिमखाना हटवण्यास मनसेचा विरोध

3 → उपोषणाने काय साधले ?

'ॲफिडेव्हीट'ला आता कायमचाच रामराम ← 4

## मराठी पाऊल पडतंय मागे मुंबईत वाढतोय हिंदीचा टक्का

### मराठी भाषिकांचे प्रमाण घटले तर हिंदी भाषिकांचे प्रमाणात ४० टक्के वाढ

**मुंबई - भारत हा विविधतेनं नटलेला देश आहे. राष्ट्रभाषा हिंदी असली तर प्रदेशानुसार वेगवेगळया भाषा देशात बोलल्या जातात. महाराष्ट्राची मातृभाषा मराठीची राज्याच्या राजधानीतली अवस्था मात्र वाईट झाली आहे. मुंबईत बाहेरून येणाऱ्यांची संख्या जास्त आहे. मराठी माणसांची मुंबई ही खरी राजधानीची ओळख पण आता याच मराठीचा टक्का कमी होत असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. मुंबईत हिंदी भाषिकांची संख्या वाढत आहे. दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. २०११च्या जनगणना अहवालानुसार मुंबईत हिंदी मातृभाषा असलेल्यांचे प्रमाण तब्बल ४० टक्क्यांनी वाढले आहे. तर मराठी मातृभाषिकांचे प्रमाण मात्र २.६४ टक्के घटले आहे. २००१ मध्ये मुंबईत हिंदी भाषिकांची संख्या जवळपास २६ लाख होती. त्यामध्ये वाढ होऊन २०११ ला ती ३६ लाख इतकी झाली आहे.**



*मराठी भाषिकांची आकडेवारी धक्कादायक*

मराठीच्या संदर्भात समोर आलेल्या आकडेवारीनुसार २००१ ला ४५ लाख लोकांनी मराठी मातृभाषा असल्याचं सांगितलं होतं. तर दहा वर्षांनी २०११ मध्ये यात घट होऊन ४४ लाखांवर मराठी भाषिक पोहचले.

*मुंबईसह आसपासच्या जिल्ह्यातही हिंदी भाषिकांचे प्रमाण वाढले*

मराठी भाषिकांचे प्रमाण फक्त मुंबईपुरतं मर्यादीत नाही. तर ठाणे आणि रायगडमध्येही मराठी मातृभाषा असलेल्यांची संख्या चिंता वाढवणारी आहे. ठाणे, रायगडमध्ये मुंबईच्या दुप्पट म्हणजे ८० टक्के हिंदी भाषिकांचे प्रमाण वाढलं आहे. याचा परिणाम इथल्या सामाजिक परिस्थितीवरही होत आहे. यात स्थानिक आणि बाहेरुन आलेल्यांमध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. यावरुन नेतेमंडळी राजकारणही मोठ्या प्रमाणावर करत आहेत.

*उत्तर भारतीयांच्या मुंबईत स्थलांतरात दुप्पट वाढ*

स्थलांतराची आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्रातून मुंबईत येणाऱ्यांचे प्रमाण गेल्या ७० वर्षात ४ टक्क्यांनी घटले आहे. १९६१ साली महाराष्ट्रातून मुंबईत स्थलांतरीत होणाऱ्यांचे प्रमाण ४१ टक्के होते. तेच प्रमाण २००१ मध्ये ३७ टक्के झाले. याऊलट उत्तर प्रदेशातून येणाऱ्यांच्या प्रमाणात मात्र दुपटीने वाढ झाली. १९६१ ला उत्तर प्रदेशातून मुंबईत येणाऱ्यांचे प्रमाण १२ टक्के होते. ते २००१ मध्ये २४ टक्क्यांवर पोहचले. कमी वेतन असलेल्या ठिकाणी आणि जिथं काम मिळेल की नाही याची शाश्वती नाही अशा ठिकाणी उत्तर भारतीयांचे प्रमाण जास्त आहे.

*मराठी भाषिकांच्या स्थलांतराचे प्रमाण कमी पण लोकसंख्या जास्त*

मराठी भाषिकांचं मुंबईत येण्याचं प्रमाण कमी झालं असलं तरी इतर भाषिकांपेक्षा मुंबईत मराठी मातृभाषा असलेल्यांची संख्या जास्त आहे. २००१ ला ४५.२४ लाख मराठी भाषिक मुंबईत होते. तेच २०११ मध्ये ४४.०४ लाख झाले. त्या तुलनेत गुजराती लोकांची संख्या २००१ ला १४.३४

उर्वरित पृष्ठ 2 वर




### तहसीलदारांच्या थर्तीवर वेतनः बक्षी समितीने तोंडाला पाने पुसली

## पोलिसांचा दहा वर्षाचा लढा ठरला व्यर्थ



### खुद्द शासनाकडूनही निराशा

**एकनाथ खडसे, देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस सरकारमध्ये पोलीस निरीक्षकांना तहसीलदारांच्या धर्तीवर वेतन मिळावे म्हणून चार वेळा तारांकित प्रश्न उपस्थित केले. मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांची नागपुरात 'रामगिरी'वर पोलीस निरीक्षकांनी भेट घेतली. तेंव्हा मला संपूर्ण प्रकरण माहित आहे, मी तुम्हाला नक्की न्याय देईल, असे आश्वासन त्यांनी दिले. मात्र पोलिसांना अद्याप न्याय मिळाला नाही.**

**यवतमाळः तहसीलदारांच्या धर्तीवर सहाव्या वेतन आयोगात मूळ वेतन मिळावे यासाठी पोलीस निरीक्षकांनी गेल्या दहा वर्षांपासून कायदेशीर लढा चालविला होता. किमान सातव्या वेतन आयोगात तरी ही मागणी मान्य होईल, अशी अपेक्षा होती. परंतु बक्षी समितीनेही तोंडाला पाने पुसल्याने पोलिसांचा हा लढा व्यर्थ ठरला.**

तहसीलदार व पोलीस निरीक्षक ही राजपत्रित अधिकाऱ्यांची वर्ग-१ समक्षक पदे आहेत. महसूल व पोलीस दलातील पोलीस शिपाई ते तलाठी पदापर्यंत समकक्ष आहे. त्यामुळे या सर्व पदांना समान वेतन द्यावे, अशी मागणी पोलिसांकडून केली गेली. महसूलच्या तुलनेत पोलिसांच्या ड्युटीचे तास, कामाचा ताण आणि संघर्ष, धोका अधिक असल्याचे कारणही वाढीव वेतनासाठी दिले होते. विविध मंत्री-आमदारांना साकडे घालून सरकार स्तरावर प्रयत्न केले गेले. मात्र त्यातून केवळ सहानुभूती, सांत्वन व आश्वासना पलिकडे काहीच मिळत नसल्याचे पाहूण अखेर २००८ मध्ये राज्यातील १३ पोलीस निरिक्षकांनी एकत्र येत थेट 'मॅट'मध्ये प्रकरण दाखल केले. 'मॅट'मधून उच्च न्यायालयात व तेथून पुन्हा 'मॅट'मध्ये प्रवास व तारीख पे तारीख करीत दहा वर्षे लोटली. मात्र तेथेसुद्धा पोलिसांना न्याय मिळाला नाही. दररोज विविध गुन्ह्यांचा काटेकोर तपास करुन, आरोपीला शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करुन अनेकांना न्याय मिळवून देणाऱ्या पोलिसांनाच न्यायापासून वंचित रहावे लागले. १३ पैकी पुढे कही निरीक्षक गळाले. मात्र दिनकर सावरकर या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाने हा लढा कायम ठेवला. परंतु आता तेसुद्धा निवृत्त झाले. या १३ पैकी आता परमार (संगमेश्वर जि. अहमदनगर) हे एकमेव पोलीस निरीक्षक सेवेत आहेत.

## युती झाली नसतानाही शिवसैनिकांचा किरीट सोमय्यांच्या उमेदवारीला विरोध

**मंबई** - आगामी लोकसभा निवडणुकीत शिवसेना-भाजप यांची युतीची बोलणी सुरू असून अजून युतीची घोषणा झालेली नसतानाच शिवसैनिकांनी मात्र युती होणारच, असे गृहीत धरून भाजप उमेदवार किरीट सोमय्या यांच्या नावाला विरोध दर्शवत प्रचार करणार नसल्याचे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना कळवले आहे. ईशान्य मुंबई मतदारसंघातून भाजपचे फायरब्रँड नेते किरीट सोमय्या पुन्हा लोकसभेच्या रिंगणात उतरत आहेत. त्यांनी आपला प्रचारही सुरू केला आहे.

शनिवारी उद्धव ठाकरे यांनी ईशान्य मुंबई मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची बैठक मातोश्रीवर बोलावली होती. या बैठकीत या मतदारसंघात शिवसेनेचे असलेले काम, संभावित उमेदवार, शिवसेनेची ताकद आदी मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती बैठकीस उपस्थित सूत्रांनी दिली. या वेळी मातोश्रीबाहेर ईशान्य मुंबईतील शिवसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या वेळी भाजपशी युती झाल्यास किरीट सोमय्या युतीचे उमेदवार असतील तर त्यांचा प्रचार करणार नाही, असा शिवसैनिकांचा मानस असल्याचे पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांना सांगितले.

गेले काही महिने सोमय्या यांनी उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र सोडत आहेत. उद्धव ठाकरे आणि शिवसेनेला जाग यावी आणि त्यांनी जमिनीवर यावे, अशी टीका त्यांनी गुजरात आणि हिमाचलमध्ये भाजपला मिळालेल्या विजयानंतर केली होती. शिवसेनेने गुजरातमध्ये निवडणूक लढवणार नाही, असे जाहीर केले असतानाही भाजपची मते खाण्यासाठी उमेदवार उभे केले होते. त्यापूर्वी मुंबई महापालिका निवडणुकीच्या काळातही किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर चांगलीच टीका केली होती. पालिकेच्या विकासकामांतील टक्केवारी मातोश्रीवर पोहोचत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. दरम्यान, शिवसेना आणि भाजपची युती होते का? हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे. त्यामुळे हा विरोध निरर्थक असल्याचे एका नेत्याने सांगितले.



## मोदी पुन्हा पंतप्रधान झाले तर बेरोजगारीचा बकासूर माजणार-राष्ट्रवादी

**दिल्ली** - भाजपा समर्थकांनी नरेंद्र मोदी हेच पुन्हा पंतप्रधान व्हावेत यासाठी #ComeAgainModiji हा ट्विटर ट्रेंड सुरु केला आहे. याच ट्विटर ट्रेंडवर राष्ट्रवादीने ट्विटरच्या माध्यमातूनच निशाणा साधला आहे. मोदी पुन्हा पंतप्रधान झाले तर बेरोजगारीचा बकासूर माजेल असं राष्ट्रवादीनं म्हटलं आहे. यासाठी राष्ट्रवादीने एका व्यंगचित्राची मदत घेतली आहे. या व्यंगचित्रात एक भलामोठा राक्षस दाखवण्यात आला आहे. हा राक्षस जनतेला तुडवतो आहे असं दाखवण्यात आलं आहे.


मोदी पंतप्रधान झाले तर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या या समस्या वाढतील असेही या ट्विटमध्ये म्हटलं आहे. बेरोजगारीचा बकासूर तरूणाईला तुडवतोय असे दाखवण्यात आले आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकांच्या वेळी ज्याप्रमाणे सोशल मीडियाचा प्रभावी वापर भाजपाकडून करण्यात आला होता. आता तसाच वापर राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात येतो आहे.

## जातपडताळणी समित्या होणार बंद



जातवैधता प्रमाणपत्राबाबत राज्य सरकारने महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यामध्ये जातवैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजविणे, ती मिळण्यास होणारा विलंब व त्यामुळे होणारे नुकसान तसेच केला जाणारा भ्रष्टाचार यातून आता सुटका केली जाणार आहे. सर्व जातपडताळणी समित्या गुंडाळून ती देण्यासाठी सुटसुटीत पद्धत आणण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. यासाठी जात प्रमाणपत्र कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

### सौजन्य व्हॉट्सअप




## अंधेरी साईवाडी येथे सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस व सत्कार सोहळा







आश्रय ट्रस्ट संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने सलंग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्सच्या फाऊंडेशनच्यातीने मागील ४ वर्षांपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी साई वाडी अंधेरी येथे विविध प्रकारचे कार्यक्रम व जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करण्यात येतात. यावेळी ५० जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. या कार्य क्रमाचे नियोजन सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन राष्ट्रीय उपसचिव संतोष चौधर हे करत असुन अंधेरी कमिटी अध्यक्षा श्रीमती तुकाबाई चौधर यांचे सहकार्य असते.

या कार्यक्रमामध्ये नेहमीप्रमाणे पत्रकार अनंत दाभोळकर , पंढरीनाथ खंडागळे ,वासुदेव पाष्टे, दिलीप प्रभु, हरिशचंद्र रेवाळे, काशिनाथ मांडवकर, दिपकमहाडिक, महादेव पारदले, उल्हास शिरसोळे ,शशिकांत बंड, रमेश धोपट, राजाराम चव्हाण यांनी अथक मेहनत घेऊन सदर कार्यक्रम पार पाडला.

# बाके बडवून सत्य मरेल काय?, शिवसेनेनं भाजपला दाखवले 'काळे पान'

**मुंबई** - बहुचर्चित राफेल करारावरून सामनाच्या आजच्या अग्रलेखातून पुन्हा एकदा टिकास्त्र डागण्यात आलं आहे. पंतप्रधानांनी गुरूवारी संसदेमध्ये भाषण केले. त्यावेळी त्यांनी राफेलचे समर्थन केलं. पण, त्याच्या दुसऱ्याच दिवशी राफेल प्रकरणातील काळे पान समोर आले. त्यामुळे बाके वाजवून देशभक्तीचे नारे देणाऱ्यांची तोंडे बंद झाली असा जोरदार टोला देखील सामनातून हाणला गेला आहे. दरम्यान, गुरूवारी राफेल करारातील मोदींच्या सहभागाचा दस्तऐवज देखील समोर आला. दैनिक हिंदूनं सारं सत्य लोकांसमोर मांडलं नाही असं भाजपवाले म्हणतात. पण, राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपाचं काय? विरोधकांना दोष का देता? असा सवाल देखील सामनाच्या आजच्या अग्रलेखातून करण्यात आला आहे. 'सत्यमेव जयते' हाच देश जिवंत ठेवण्याचा मंत्र आहे. विरोधक मारले जातील, पण सत्य जिवंत राहील! असं देखील अग्रलेखामध्ये म्हटलं आहे.

जाहीर सभेत तावातावाने बोलावे व झोडपाझोडपी करावी अशाच थाटाचे भाषण आपले पंतप्रधान मोदी संसदेतही करतात. सत्ताधारी पक्षाचे लोक पंतप्रधानांच्या प्रत्येक वाक्यावर बाके बडवीत असतात. पण त्यामुळे संसदेच्या थोर परंपरेत काही भर पडत आहे काय? पंतप्रधान मोदी यांनी गुरुवारी लोकसभेत काँग्रेसला ठोकून काढले. चांगलीच सालटी काढली. देशाचे हवाई दल बळकट होऊ नये यासाठीच राफेल करारावर सातत्याने टीका सुरू असल्याचा आरोप मोदी यांनी केला. काँग्रेसला लष्कराचे बळकटीकरण नको आहे असे नेहमीचेच आरोप पंतप्रधान



करतात व दुसऱ्याच दिवशी राफेल करारात मोदी यांना व्यक्तिगत रस किती टोकाचा होता याबाबतचे कागदोपत्री पुरावे उघड होतात, यास काय म्हणायचे? राफेल करार हा हवाई दलाच्या बळकटीकरणासाठी झाला की एका गाळात बुडालेल्या उद्योगपतीच्या बळकटीकरणासाठी झाला? या प्रश्नाचे उत्तर पंतप्रधानांकडून अपेक्षित आहे. राफेलच्या व्यवहारात थेट आपले मोदीच 'डील' करीत होते. संरक्षणमंत्री, संरक्षण सचिव वगैरे प्रमुख मंडळींना या व्यवहारापासून लांब ठेवले गेले. राफेलच्या किमती ठरवण्यापासून ते हे कंत्राट कुणाला द्यायचे याबाबतचे सर्व निर्णय मोदी यांनीच घेतले आहेत. त्यामुळे आरोप व टीकेचे धनी त्यांना व्हावेच लागेल. 'चौकीदार चोर है' हा नारा राहुल गांधी यांनी दिला व तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. यास काँग्रेस जबाबदार नाही तर राफेल प्रकरणातली आता उघड झालेली लपवाछपवी कारणीभूत आहे. श्री. मोदी म्हणतात, 'तुम्ही मोदींवर टीका करा, भाजपवर टीका करा, पण देशावर टीका करू नका.'' याचा अर्थ मोदीभक्तांनीच समजावून सांगावा.

जो राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित आहे त्यावर खुलासा मागणे ही देशावर टीका कशी काय होऊ शकते? देशात लोकशाही आहे व तिचे खच्चीकरण कोण करीत आहे? लोकशाही व न्याय व्यवस्थेची बूज राखण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची असते. विरोधकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे व हा अधिकार नाकारणे म्हणजे लोकशाहीचे खच्चीकरण. साडेचार वर्षांपासून देशावर मोदींचे एकछत्री राज्य आहे. तरीही महागाईपासून भ्रष्टाचारापर्यंत प्रत्येक गोष्टीचे खापर काँग्रेसवर फोडणे हे स्वतःचे अपयश झाकण्यासारखे आहे. सत्तर वर्षांत काँग्रेसने काय केले? या प्रश्नाच्या फेऱ्यातून मोदी व त्यांचे सरकार सत्तेचा कालावधी संपत आला तरी बाहेर पडलेले नाही. लोकांनी त्यांना सत्ता दिली, पण सत्ता ही फक्त विरोधकांच्या नाड्या आवळण्यासाठी वापरली गेल्याने सत्ताधाऱ्यांना पुनःपुन्हा काँग्रेसवर टीका करावी लागत आहे. काँग्रेसने देश कमजोर केला हा मोदींचा आरोप मान्य आहे. काँग्रेसवाले चोर, लफंगे, भामटे व डाकू आहेत. प्रत्येक काँग्रेसवाल्यास भरचौकात फासावर उलटे लटकवायला हवे. काँग्रेस ही शिवी आहे हे सर्व मान्य केले तरी राहुल गांधी यांनी राफेल व्यवहाराबाबत विचारलेले प्रश्न कायम आहेत. पाचशे कोटींचे राफेल विमान सोळाशे कोटीस विकत घेण्यामागचा तर्क काय? व समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत देशाचा प्रत्येक नागरिक हा प्रश्न विचारीत राहील. राजकारणात तळे राखी तो पाणी चाखी हे मान्य, पण येथे समुद्रच गिळला जात आहे. सध्याच्या राजवटीत राष्ट्रवाद आणि देशभक्तीच्या व्याख्या बदलण्यात आल्या आहेत. राफेल कराराचे भजन गाईल तोच देशभक्त व राफेलच्या किमतीत वाढ करून कुणाचा फायदा केला, असे विचारणारे देशद्रोही. पंतप्रधान मोदी यांनी संसदेत केले. राफेलचे समर्थन केले.

## महापौर बंगल्यासाठी जिमखाना हटवण्यास मनसेचा विरोध

**मुंबई** - शिवाजी पार्क येथील महापालिका कर्मचाऱ्यांसाठी असलेला जिमखाना हटवून तेथे नवीन महापौर बंगला उभारण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास जोरदार विरोध केला जाईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पालिकेला दिला आहे. त्यामुळे महापौर बंगल्यावरून शिवसेना-मनसेमध्ये सामना रंगण्याची चिन्हे आहेत. मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात शिवाजी पार्क येथील जिमखान्याच्या जागी नवीन महापौर निवासस्थान उभारण्यासाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मनसेने विरोधाचे बिगुल वाजवले आहे. जिमखान्याच्या जागेवर बंगला उभारण्यासाठी एक वीटही रचू देणार नसल्याचा इशारा मनसेकडून देण्यात आला आहे. शिवाजी पार्क येथील जुन्या महापौर बंगल्याच्या



ठिकाणी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. यासाठी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी काही दिवसांपूर्वीच हा जुना बंगला रिकामा करून ते राणीबागेतील पर्यायी बंगल्यात राहायला गेले आहेत.

*धक्कादायक; बोगस डॉक्टर ४ वर्षांपासून करत होते उपचार*

## ५७ बोगस डॉक्टरांचा पोलिसांनी केला पर्दाफाश

**मुंबई - देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईमध्ये तब्बल ५७ बोगस डॉक्टरांचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. धक्कादायक म्हणजे मागील ४ वर्षांपासून हे डॉक्टर प्रॅक्टिस अर्थात रूग्णांवर उपचार करत होते. महाराष्ट्र मेडिकल काऊंन्सिलमध्ये नाव रजिस्ट्रेशन करण्यासाठी या बोगस डॉक्टरांनी पोस्ट ग्रॅज्युएशनची डिग्री देखील मिळवली असल्याची माहिती आता पोलीस तपासातून समोर येत आहे. या साऱ्या प्रकारानंतर या डॉक्टरांचं लायसन्स रद्द करण्यात आलं आहे.**

***एकाच बॅचचे ५७ बोगस डॉक्टर***

या बोगस डॉक्टरांनी मुंबईतील फिजिशियन आणि सर्जन या कॉलेजमधून २०१४-१५ साली डिग्री मिळवली होती. त्यानंतर या डॉक्टरांविरोधात ऑक्टोबर २०१८साली गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी फिजिशियन आणि सर्जन कॉलेजच्या एका विद्यार्थ्याला देखील अटक करण्यात आली आहे. जो विद्यार्थ्यांना बोगस डिग्री मिळवून देण्यामध्ये मदत करत होता. सीपीएस कॉलेजच्या नावाखाली डॉ. स्नेहल न्याती या प्रत्येक विद्यार्थ्याकडून ३ ते ५ लाख रूपये घेत होत्या. त्याबदल्यात विद्यार्थ्यांना नापास झाल्यानंतर देखील बोगस डिग्री दिली जात होती.

***मेडिकल काउंन्सिलमध्ये रजिस्ट्रेशन***

दरम्यान, या बोगस डिग्रीच्या जोरावर काही विद्यार्थ्यांनी मेडिकल काउंन्सिलमध्ये रजिस्ट्रेशनकरता अर्ज केला होता. त्यानंतर त्यांना प्रॅक्टिस करण्यासाठी परवानगी देखील देण्यात आली आहे. अशी माहिती देखील आता पोलीस तपासातून पुढे येत आहे.



बोगस डॉक्टरांच्या या रॅकेटमध्ये आणखी कोण - कोण सहभागी आहे? त्याची पाळमुळं कुठपर्यंत पोहोचली आहेत? याची सखोल चौकशी देखील आता पोलीस करत आहेत.

***२०१६ साली घोटाळा आला होता समोर***

२०१६ साली सीपीएस कॉलेजचा घोटाळा समोर आला होता. जळगाव पोलीस ठाण्यामध्ये एक निनावी पत्र आलं होतं. ज्यामध्ये सीपीएस कॉलेजच्या डिग्रीबाबत सत्यता जाणून घ्या असं सांगण्यात आलं होतं. या साऱ्या प्रकारानंतर कॉलेजनं अशा प्रकारचं सर्टिफिकेट दिलं गेलं नसल्याचं स्पष्ट केलं होतं.

## धावपट्ट्यांच्या डागडुजीमुळे विमानसेवा विलंबाने




मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्ट्या देखभाल-दुरुस्तीसाठी आठवड्यातील तीन दिवस सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत बंद राहणार आहेत. डागडुजीचे काम गुरुवारपासून सुरू करण्यात आले असून त्याचा फटका प्रवाशांना बसत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी २३० विमानांचे उड्डाण रद्द करण्यात आले होते, तर ३३ टक्के विमानांना उशीर झाला. अशा परिस्थितीत विमानांची कमतरता आणि वर्दळीच्या मार्गावरिल प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन विमान कंपन्यांनी तिकीट दर दुपटीपेक्षा जास्त वाढवल्याचे समजते.

डागडुजीसाठी विमानतळावरील दोन्ही धावपट्टय़ा २८ फेब्रुवारीपर्यंत मंगळवार, गुरुवार आणि शनिवार या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यापैकी प्रमुख धावपट्टीवरून तासाला ५० विमाने उड्डाण करतात आणि उतरतात. अन्य धावपट्टीवरून तासाला ३५ विमानांची ये-जा होते. दोन्ही धावपट्टय़ा गुरुवारी सहा तास बंद राहिल्याने वर्दळीच्या मार्गावरील २३० विमानसेवा रद्द करण्यात आल्या.

## वीज कामगारांचा संपाचा इशारा

**मुंबई** - सल्लागार मंडळाच्या बैठकीत वेतनवाढीबाबत ठोस आश्वासन न मिळाल्यामुळे २० फेब्रुवारीपासून संपावर जाण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य महानिर्मिती कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीने दिला आहे. महानिर्मिती, महावितरण, महापारेषण व सूत्रधारी कंपनी तसेच इतर उद्योगातील दोन कोटी संघटित व असंघटित कामगारांच्या वेतनाबाबत २ फेब्रुवारी रोजी सल्लागार मंडळाची बैठक झाली. मात्र त्यामध्ये कोणतेही लेखी आश्वासन मिळाले नाही. मूळ वेतन २३ ते २४ हजार करावे, अशी कामगारांची मागणी आहे.

## शिवशाहीने प्रवास करणाऱ्यांसाठी आनंदवार्ता; दर ५०५ रुपयांनी झाले कमी

**मुंबई** - एसटी महामंडळाने शिवशाही बस सेवेचे तिकीट दर २३० ते ५०५ रुपयांनी कमी केले आहेत. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या १३ फेब्रुवारीपासून नवे दर लागू होणार आहेत.


राज्यातील ४२ मार्गावर शिवशाही बस (स्लीपर) धावते.



खासगी वाहतुकीशी स्पर्धा करण्यासाठी शिवशाहीच्या दरकपातीचा विचार सुरु होता. तसा प्रस्ताव देखील प्राधिकरणाकडे पाठवण्यात आला होता. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि खासगी वाहतुकीशी स्पर्धा तसेच लांब पल्ल्याचा प्रवास ज्येष्ठ नागरिकांना सुखकर आणि माफक दरात व्हावा या उद्देशाने ही कपात करण्यात आल्याचे परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी सांगितले.

## 'ट्राय'ची नवी नियमावली 'डीटीएच'चालकांच्या पथ्यावर

**मुंबई** – 'भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण'च्या (ट्राय) नव्या नियमावलीचा फायदा अद्याप केबल ग्राहकांपर्यंत पोहोचला नसला तरी डीटीएच सेवा घेणाऱ्या ग्राहकांना या नियमावलीचे फायदे मिळायला सुरुवात झाली आहे. डीटीएचचालक वेगवेगळ्या पॅकचे पर्याय ग्राहकांसमोर ठेवत आहेत. त्यामुळे भविष्यात केबलचा ग्राहक डीटीएचकडे वळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



१ फेब्रुवारीपासून नवी नियमावली लागू झाली. वाहिनी निवडीचा अधिकार अग्रभागी असलेल्या या नियमावलीमुळे मासिक शुल्कात कपात होईल, अशी अपेक्षा वर्तवली जात होती. त्याप्रमाणे टाटा स्काय, डीश टीव्ही, एअरटेल या डीटीएच सेवेच्या मासिक शुल्कात कपात झाली आहे.

केबलचालकांच्या तुलनेत 'ट्राय'च्या नव्या नियमांची अंमलबजावणी डीटीएचचालकांकरिता सोपी आहे. अनेकांनी आपल्या संकेतस्थळ, एसएमएस, समाजमाध्यम अशा माध्यमांतून ही नियमावली ग्राहकांपर्यंत पोहोचवली आहे. विविध विषयांना वाहिलेल्या वाहिन्यांचे पॅक (एकगठ्ठा) ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अनेक प्रादेशिक वाहिन्यांचा समावेश असलेले हिंदी वाहिन्यांसोबतचे पॅक स्वस्त दरात उपलब्ध करून दिले जात आहेत. उदाहरणार्थ, टाटा स्कायने १०० नि:शुल्क वाहिन्यांच्या १५३ रुपयांच्या पॅकसोबत 'हिंदी लाइट पॅक'मध्ये ६० वाहिन्यांचा समावेश करत तो १४२ रुपयांना उपलब्ध करून दिल्याने २९५ रुपयांत १६० वाहिन्या ग्राहकांना पाहता येणार आहेत. यालाच प्रादेशिक भाषांच्या पॅकचीही जोड देण्यात आली आहे. तसेच लहान मुलांच्या वाहिन्या, कुटुंबाला एकत्रित हव्या असणाऱ्या वाहिन्या, खेळाच्या वाहिन्या अशा पॅकेजची निवड करणेही शक्य झाले आहे. एचडी वाहिन्यांमध्ये ६१ वाहिन्यांचा समावेश असलेला पॅक केवळ २१५ रुपयांना टाटा स्कायवर उपलब्ध आहे. पॅकमध्ये निवड करायची नसल्यास 'अलाकार्ट'मध्ये प्रत्येक वाहिनी स्वतंत्रपणे निवडीचा पर्यायही सर्व डीटीएचचालकांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्यामुळे नव्या नियमामुळे स्थानिक केबलचालकांचे ग्राहक यापुढे डीटीएच सेवेकडे वळण्याची चिन्हे आहेत.

## मुंबई पोलीस ई-सायकलवरून पकडणार चोर, पाकिटमार

मुंबई पोलीस तुम्हाला सायकलवरून गुन्हेगारांचा पाठलाग करताना दिसले तर आश्चर्य वाटून घेऊ नका. कारण मुंबई पोलिसांच्या ताफ्यात लवकरच ई-सायकल दाखल होणार आहेत. ही ई-सायकल दिसायला सर्वसामान्य सायकलसारखी असली तरी त्यामध्ये काही खास वैशिष्टये आहेत. या ई-सायकलची चाचणी झाली असून पेडल मारल्याशिवायही ही सायकल २५ ते ३० किलोमीटरचे अंतर कापू शकते तसेच या सायकलचा ताशी वेग २५ किलोमीटर आहे.

या सायकलचा कसा वापर करायचा त्यासंदर्भात लवकरच पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बॅटरीवर ही सायकल तीन तास चालेल. त्यानंतर तासभराचे



चार्जिंग लागेल. मुंबई पोलीस गस्तीसाठी सुद्धा ही सायकल वापरणार आहेत. मुंबईतल्या अरुंद गल्ल्यांमध्ये वाहनांना सहजासहजी प्रवेश करता येत नाही. या सायकलमुळे पोलिसांचे गस्तीचे काम अधिक सोपे होईल.

गस्त घालताना पोलीस सामान्य सायकलसारखा याचा वापर करु शकतात. आणीबाणीच्या प्रसंगात चपळतेने कारवाई करण्यासाठी बॅटरी ऑन करुन वेग वाढवता येईल. अरुंद गल्ल्यांमध्ये चोरांचा पाठलाग करताना ही सायकल खूप फायदेशीर ठरणार आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी बाईकऐवजी ही सायकल देण्यात येईल. बॅटरीवर असताना पेडल मारले तर सायकलचा वेग आणखी वाढेल.

## मार्चपासून मोनोरेलच्या तिकीटदरात वाढ

**मुंबई** - मोनोरेलसाठी आवश्यक असणारे सुटे भाग मलेशियावरून मुंबईत दाखल झाले असून येत्या मार्चमध्ये चेंबूर ते जेकब सर्कलदरम्यानच्या पूर्ण कॉरिडोरवर मोनोरेलची सेवा सुरू होणार आहे. नवा टप्पा सुरू होताच मोनोरेल तिकिटाचे दरही वाढणार आहेत. या बरोबरच मोनोरेलच्या ताफ्यात आणखी चार ट्रेन दाखल होणार आहेत. त्यामुळेच चेंबूर ते जेकब सर्कलदरम्यान मोनोरेलच्या फेऱ्या वाढण्यास मदत होणार आहे.

लार्सन अँण्ड टुब्रोकडून डिसेंबर, २०१८मध्ये मोनोरेल चालवण्याचे काम हाती घेतल्यानंतर एमएमआरडीए आता या २० किमीच्या कॉरिडोरवर ५ ट्रेन चालवणार आहे. चेंबूर ते वडाळा अशा ८.८ किमीच्या मार्गावर सध्या तीन ट्रेन सुरू आहेत.

या मार्गावर दोन नव्या ट्रेन उपलब्ध करण्यासाठी २० दिवसांचा कालावधी लागणार आहे. त्यानंतर मार्चच्या पहिल्या आठवड्यात ही सेवा सुरू करण्यात येईल असे एमएमआरडीएचे संयुक्त प्रकल्प संचालक 'जनसंपर्क' दिलीप कवठकर यांनी माहिती देताना सांगितले.

जेएनपीटी येथे मोनोरेलचे ११२ डबे गेल्याच आठवड्यात पोहोचलेले आहेत. या डब्यांची किंमत ३ कोटी रुपये इतकी आहे. मात्र, एमएमआरडीए आणि मलेशिया



येथील स्कॉमी ईंजीनअरिंग कंपनीने त्यांवर दावा केला. मोनोरेलचे हे भाग स्कॉमी ईंजिनीअरिंग कंपनीने मागवले असले, तरी देखील एमएमआरडीए आपल्या मोनोरेलसाठी वापरणार असे कस्टम विभागाला पटवून देण्यात एमएमआरडीए यशस्वी ठरली आहे.

स्कॉमी ईंजिनीअरिंग कंपनीने प्रथम २ फेब्रुवारी २०१४ या दिवशी ८.८ किमी लांबीचा चेंबूर ते वडाळादरम्यानचा मार्ग सुरू केला. त्यानंतर, स्कॉमीला एकूण ७ मार्गांचा विस्तार करण्याची परवानगी मिळाली. जेकब सर्कल ते चेंबूर या पूर्ण कॉरिडोरवर सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत मोनोरेल सेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. दर २० मिनिटाला मोनोरेल धावणार आहे. या मार्गावर दिवसाला एकूण १३० मोनोरेल धावतील. या मार्गावर दररोज एक लाख प्रवासी प्रवास करतील असा एमएमआरडीएचा अंदाज आहे. सध्या उपलब्ध मार्गावर दररोज १५ हजार ते १७ हजार प्रवासी प्रवास करतात, अशी माहिती मोनोरेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. एल. एन. मूर्ती यांनी दिली.

## एसटीतील मेगाभरतीत २४०० महिलांना संधी, २४ फेब्रुवारी रोजी होणार भरतीसाठी लेखी परीक्षा

**मुंबई - एसटी महामंडळातील चालक-वाहक पदांच्या भरतीमध्ये आता हलके वाहन चालवण्याचा १ वर्षाचा परवाना असलेल्या महिलांनाही अर्ज करता येणार आहे. निवड झाल्यानंतर संबंधित महिलांना महामंडळामार्फत अवजड वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाईल.**

परिवहनमंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी ही घोषणा केली. यासोबत महिला उमेदवारांना उंचीच्या अटीमध्ये सवलत देण्यात आली असून उंचीची अट किमान १६० सेंमीवरून १५३ सेंमी करण्यात आली आहे. पुरुष उमेदवारांसाठी अवजड वाहन चालवण्यासंबंधी अनुभवाची अट शिथिल करण्यात आली असून ३ वर्षांऐवजी १ वर्षाचा अनुभव असलेले पुरुष उमेदवारही अर्ज करू शकतील. महामंडळामार्फत सध्या ८ हजार २२ चालक व वाहक पदांची भरती सुरू आहे.

यापैकी दुष्काळग्रस्त १२ जिल्ह्यांमध्ये ४ हजार ४१६ तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये ३ हजार ६०६ इतकी पदे भरली जाणार आहेत.



दुष्काळग्रस्त १२ जिल्ह्यांसाठी अर्ज करण्याच्या मुदतीस १५ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आधीच्या नियोजनानुसार अर्ज करण्याची मुदत ८ फेब्रुवारी होती. इतर जिल्ह्यांसाठी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे.

या पदासाठी २४ फेब्रुवारी रोजी संबंधित जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी लेखी परीक्षा होणार आहे. महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.महिला उमेदवारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांच्या शारिरक उंचीची अट शिथील करुन ती आता किमान १६० सेंमीवरुन किमान १५३ सेंमी इतकी कमी करण्यात आली आहे, अशी माहितीही मंत्री श्री. रावते यांनी दिली.

चालक तथा वाहक पदासाठी पुरुष उमेदवारांना अवजड वाहन चालविण्याचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. या अनुभवाच्या अटीमध्ये आता शिथिलता करण्यात आली आहे. त्यानुसार अवजड वाहन चालविण्याचा १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवारही या ज्यादासाठी आता अर्ज करु शकतील, अशी घोषणाही मंत्री श्री. रावते यांनी केली. अवजड वाहन चालविण्याचा ३ वर्षाचा अनुभव असलेले पुरेसे उमेदवार मिळत नसल्याचे मागील भरती प्रक्रियेत दिसून आले होते. त्यामुळे ही अट शिथील करण्यात येत असल्याचे मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी यावेळी सांगितले.

## मुंबईत दशकभरातील विक्रमी थंडी

**मुंबई** – मुंबई शहरात शुक्रवारी कमाल तापमानाचा पारा २४ अंश सेल्सियसपर्यंत खाली असल्याने मुंबईकरांना चांगलीच हुडहुडी भरली होती. सरासरीपेक्षा कमाल तापमानात जवळपास सहा अंश से.ने घट झाली आहे.

गेल्या दहा वर्षांत फेब्रुवारी महिन्यात प्रथमच तापमानाचा पारा इतका खाली गेला आहे. उत्तरेकडील थंड वाऱ्यांच्या प्रभावामुळे तापमानात घट झाल्याचे हवामान खात्याने सांगितले. पुढील दोन दिवस कमाल तापमानासह किमान तापमानामध्ये घट होण्याची शक्यता वेधशाळेने



वर्तविली आहे.

गेल्या आठवड्यात शहरातील कमाल तापमानाचा पारा ३५ अंश से. पर्यंत चढल्याने उन्हाळा परततोय का, या चिंतेच्या झळा लागल्या होत्या. परंतु सोमवारपासून तापमानाचा पारा घसरायला सुरुवात झाली. गेल्या चार दिवसांपासून मुंबईकरांना शहरात सुखद गारवा अनुभवायला मिळत आहे. शुक्रवारी दुपारीदेखील थंड वारे वाहत होते. त्यामुळे दुपारपासूनच हवेत चांगलाच गारवा जाणवत होता. शुक्रवारी सांताक्रूझ येथे २४.२ अंश से. कमाल तापमान नोंदले गेले, तर कुलाबा येथे २४.५ अंश से. नोंद झाली आहे. सांताक्रूझ येथे ६.९ अंश से.ने कमाल तापमानात घट झाली आहे, तर कुलाबा येथे ५.४ अंश से.ने तापमान कमी झाल्याचे हवामान खात्याने सांगितले. गेल्या चार दिवसांत शहरासह उपनगरांमध्येही तापमान घट झाल्याने थंडी पुन्हा अवतरली आहे.

पृष्ठ १ वरुन

## मराठी पाऊल पडतंय मागे मुंबईत वाढतोय हिंदीचा टक्का

लाख होती. ती २०११ मध्ये १४.२८ लाखांवर पोहचली.

***हिंदीशिवाय उर्दू भाषिकांचे प्रमाणही जास्त***

मराठी व्यतिरिक्त इतर भाषांचा विचार केल्यास दुसऱ्या क्रमांकावर हिंदी भाषिक आहेत. २००१ला २५.८२ लाख हिंदी भाषिक लोक होते. त्यांची संख्या २०११ मध्ये ३५.९८ लाख इतकी झाली. ही वाढ तब्बल ३९.३५ टक्के आहे. याशिवाय उर्दू बोलणाऱ्यांचे प्रमाण घटले आहे. २००१ला उर्दू भाषिक १६.८७ लाख होते. तर २०११ ला यात घट होऊन १४.५९ लाखांवर पोहचले.

मुंबईत जेव्हा कापड गिरण्या सुरु झाल्या तेव्हा महाराष्ट्रातून स्थलांतर होणाऱ्यांचे प्रमाण वाढले. त्याआधी मुंबईला बंदराचे शहर म्हटलं जायचं. कापड गिरण्या सुरु होत्या तोपर्यंत कोकण, पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर लोकं मुंबईत स्थायिक झाली. या लोकांची मातृभाषा मराठीच होती. जेव्हा कापड गिरण्यांमधील नोकऱ्या कमी झाल्या तेव्हा उत्तर प्रदेश, बिहार येथून येणाऱ्यांचे प्रमाण वाढले. मराठीचा टक्का कमी होऊन हिंदी भाषिकांचं वाढतं प्रमाण काळजी वाढवणारं आहे.

# संपादकीय...

## उपोषणाने काय साधले?



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

लोकपाल नियुक्ती आणि शेतकरी प्रश्न यांसाठी अण्णा हजारे यांनी सुरू केलेले उपोषण सातव्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संपले. काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात अण्णांनी दिल्लीत केलेल्या उपोषणाने देशभर जशी वातावरणनिर्मिती झाली, तसे यावेळी झाले नाही. गेल्या वर्षीही अण्णांनी राजधानीत उपोषण केले होते; परंतु त्याहीवेळी त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. अण्णांच्या उपोषणाच्या निमित्ताने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात रान पेटविणारी मंडळी सत्तेवर येण्यासहित इतरही अनेक कारणे यामागे असू शकतात. मात्र, यांमुळे अण्णांचे उपोषणास्त्र बोथट होत गेले. ताज्या आंदोलनातून अण्णांच्या हाती ठोस काय गवसले हा प्रश्नच आहे. मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंह यांनी अण्णांना एक पत्र दिले. जुनेच, पण तारखा बदलून दिलेल्या या पत्राद्वारे ज्या मागण्या मान्य केल्या गेल्या आहेत, त्या गेल्या वर्षीच्या अण्णांच्या आंदोलनाच्या वेळीही मान्य झाल्या होत्या. फरक इतकाच आहे, की नव्या पत्रात मागण्यांच्या पूर्ततेसाठी निश्चित अशी मुदत आहे. अर्थात, या मागण्यांसाठी कालावधी ठरला होता, तो पाळला गेला नाही म्हणून तर अण्णा आता उपोषणाला बसले होते. लोकपाल नियुक्तीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शोध समितीची बैठक १३ फेब्रुवारीला होणार असल्याचे या पत्रात नमूद आहे. या प्रकरणी संयुक्त मसुदा समिती स्थापून विधेयक तयार केले जाईल आणि अर्थसंकल्पी अधिवेशनात तो विधिमंडळात ठेवला जाईल, असे आश्वासनही आहे. कृषिमूल्य आयोगाला वैधानिक दर्जा प्राप्त होत असल्याचे नमूद करून त्याच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समितीही होणार आहे. 'पंतप्रधान किसान सन्मान योजने'तील सहा हजार रुपये ही अर्थसाहयाची मर्यादा वाढविण्याचा उल्लेखही या पत्रात आहे. या मुद्द्यांवर अण्णांनी उपोषण मागे घेतले असून, ते योग्यच झाले. त्यांच्या प्रकृतीचा विचार करता उपोषण सुटणे आवश्यक होते. मात्र, आपल्या आंदोलनाच्या शैलीबद्दल अण्णांनी आता फेरविचार करायला हवा. ते उपस्थित करीत असलेला 'लोकपाल'चा मुद्दा महत्त्वाचा असला, तरी तो प्रत्यक्षात येण्यातील अडचणी आणि भविष्यात त्याला येणारे स्वरूप यांचाही विचार होण्याची गरज आहे. आपल्या आंदोलनात पक्षांना शिरकाव मिळू नये असा प्रयत्न अण्णा करीत आहेत. अरविंद केजरीवाल प्रकरणापासून धडा घेऊन त्यांनी हे धोरण स्वीकारले. यावेळीही अण्णांच्या व्यासपीठावर राजकीय नेते दिसले नाहीत. मात्र, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या विरोधकांनी या आंदोलनाचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही पुढे सरसावला; परंतु राळेगणकरांनी नकार दिल्यामुळे त्याला यश आले नाही. उद्धव ठाकरे यांनी पत्रक काढले, तर राज ठाकरे यांनी थेट राळेगणच गाठले. काँग्रेस नेते राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब थोरात हेही अण्णांना भेटून गेले. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेले अण्णांचे आंदोलन विरोधकांच्या हाती जाऊ नये म्हणून भाजपने पावले उचलली. पालकमंत्री प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, संरक्षण राज्यमंत्री सुभाष भामरे, माजी मंत्री सोमपाल शास्त्री, केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंह आणि अर्थातच मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्यक्ष येऊन शिष्टाई केली. शेवटच्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी अण्णांशी बंद खोलीत तब्बल साडेपाच तास चर्चा केली. मुख्यमंत्री मनातून उतरल्याचे म्हणणाऱ्या अण्णांशी फडणवीस यांनी यशस्वी चर्चा केली. अण्णांचे उपोषण सुटल्यानंतर कोण जिंकले याची चर्चा सुरू झाली असली, तरी केवळ 'जिंकले-हरले'च्या भूमिकेतून विश्लेषण करणे चुकीचे ठरेल. अण्णांनी सरकारला वाकवले किंवा सरकारने अण्णांना गुंडाळले या टोकाच्या प्रतिक्रियांच्या पलीकडे जाऊन विचार होणे आवश्यक आहे. ग्रामविकासापासून भ्रष्टाचार निर्मूलनापर्यंतच्या विविध मुद्द्यांवर अण्णा तीन दशके लढा देत आहेत. त्यांच्या आजवरच्या आंदोलनांत मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले, राजकीय पक्षांनी त्यांचा लाभ उठविला आणि भ्रष्ट मंडळींनीही आपला हेतू साधला. अण्णांच्या अशा आंदोलनांतूनच ग्रामविकासाबाबत जागरूकता झाली, आदर्श खेड्यांची कल्पना सर्वदूर गेली आणि जलसंधारणाच्या कामांना गती आली. भ्रष्टाचार समूळ नष्ट होणे ही काही सोपी गोष्ट नाही; त्यामुळे तो कायम राहिला तरी लोकपाल यंत्रणेची संकल्पना रुजली हे नाकारता येत नाही. अण्णांच्या आंदोलनांच्या परिणामांचा विचार त्यांच्यासह सर्व संबंधितांनी; विशेषत: सरकारने करण्याची गरज आहे.



# जुमलावालेबाज अर्थसंकल्प!




**महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होते आहे. केंद्र सरकारने आगामी सार्वत्रिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अंतरिम म्हणत संपूर्ण अर्थसंकल्पच मांडला. राज्य सरकारला पूर्ण अर्थसंकल्प मांडता येतो. विधानसभेच्या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणे अपेक्षित आहे. त्यामुळे राज्याचा अर्थसंकल्पही जुमलेबाजच असेल का?**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होते आहे. केंद्र सरकारने आगामी सार्वत्रिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अंतरिम म्हणत संपूर्ण अर्थसंकल्पच मांडून टाकला. राज्य सरकारला पूर्ण अर्थसंकल्प मांडता येतो. विद्यमान विधिमंडळाची मुदत १ डिसेंबरपर्यंत आहे. विधानसभेच्या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणे अपेक्षित आहे. लोकसभेबरोबर विधानसभेच्या निवडणुका घेणे आता अशक्य आहे. ती शक्यता मावळली आहे. राज्य सरकारने विधानसभा बरखास्तीचा निर्णय किमान सहा महिने आधी घेऊन तशी शिफारस करायला हवी होती. ती काही केलेली नाही. त्यामुळे मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांबरोबर विधानसभेच्या निवडणुका महाराष्ट्रात तरी होण्याची शक्यता मावळली आहे.

राज्यातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वातावरण सध्या निवडणुका घेण्यास अनुकूल नाही. विविध समाज घटकांच्या मागण्यांनी वातावरण तापले आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला आहे, असे म्हणता येणार नाही. त्याचा परिणाम दिसायला हवा होता. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्यावर आता कोठे बाजू मांडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मराठा समाजातील एका मोठ्या वर्गाची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यातून निर्माण झालेल्या असंतोषाचे 'मराठा मोर्चा' हे प्रतीक होते. यावर सर्वच राजकीय पक्षांकडे समाधानकारक उत्तर नाही.

धनगर आरक्षण, लिंगायत समाजासाठी स्वतंत्र धर्माचा दर्जा देण्याची मागणी, मुस्लिम समाजाची पाच टक्के आरक्षण देण्याची रेंगाळलेली मागणी, आदी प्रश्न सोडविण्यात यश आलेले नाही. या प्रश्नांमुळे महाराष्ट्राचे राजकीय वातावरण गढूळ बनले आहे. त्यावर ठोस उपाय केले जात नाहीत. राजकीय मतैक्य होत नाही.

राजकीय आघाडीवर अनेक विरोधाभास तयार झाले आहेत. भाजपला प्रथमच मिळालेली सत्ता टिकविण्यासाठी स्वपक्षाचा विस्तार करायचा आहे. त्यात सहकारी पक्ष शिवसेना अडसर ठरतो आहे. शिवसेनेच्या पाठिंब्याशिवाय राज्य सरकार टिकून राहत नाही. त्यामुळे त्यांना डावलताही येत नाही. शिवसेनेची रया गेली आहे, तरीही आपणच मोठे भाऊ असल्याचा आव आणत आहेत. सत्तेत राहून विरोधकाप्रमाणे वर्तन आहे, ते टीकेची एकही संधी सोडत नाहीत. सत्ताधारी आणि विरोधक यांची जागा याच दोन्ही सत्ताधारी मित्रपक्षांनी व्यापून टाकली आहे, हा किती मोठा विरोधाभास आहे. तो महाराष्ट्राच्या भल्यासाठी नाही. तो केवळ वर्चस्ववादातून निर्माण करण्यात आलेला विरोधाभास आहे. या दोन्ही पक्षांचा ज्या कारणांनी संघर्ष चालू आहे, तो न संपणारा आहे. मोठ्या भावाची भूमिका निभावण्यासाठी आहे. ती भूमिका जन्मजात नाही, संख्येच्या आणि ताकदीच्या जोरावर ठरणार, हे स्पष्ट आहे. त्यामुळे ही संकल्पनाच लागू पडत नाही.

सत्ताधारी पक्षांच्या या विरोधाभासी राजकारणाने महाराष्ट्राने कोणताही एक आगळावेगळा विकासाचा मार्ग स्वीकारला नाही. शहरीकरण, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, वितरण, शिक्षण, आदी व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि शेतीच्या गंभीर समस्या यावर नवा मार्ग काही दिसत नाही. शेती, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि रोजगार यावर गांभीर्याने निर्णय घेण्यासाठी विकासाची दिशा स्पष्ट झाली पाहिजे. ते काही घडणार नाही, कारण त्यांच्या राजकीय धोरणात कटुता आहे. एकसुरी किंवा एकजिनसीपणा नाही. एक-दोन मंत्र्यांचा अपवाद सोडला तर व्हिजनच नसलेल्यांचे मंत्रिमंडळ काम करते आहे. मंत्रालयात न येणारे मंत्रिमंडळ आहे. महाराष्ट्रभर फिरण्यात सर्वांत अधिक वेळ जातो. त्यातही सभा-समारंभांना हजेरी लावण्यात मंत्र्यांचा जोर असतो.

याउलट विरोधी पक्षांची स्थिती आहे. पंधरा वर्षे एकत्र काम करून महाराष्ट्राच्या विकासाची एक नवी घडी घालण्यात अपयश आले आहे. त्याच वाटेवर जाणाऱ्या सत्ताधाऱ्यांना पर्याय देण्यासाठी पाच वर्षे मिळाली होती. त्या काळात अधिक गांभीर्याने विचार करून एक दिशादर्शक मॉडेल तयार करता येऊ शकले असते. मात्र, या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विश्वासार्हतेचे वातावरणच नाही. या दोन्ही पक्षांना एकत्र येऊनच राजकीय लढाई द्यावी लागणार आहे, हे सूर्य प्रकाशाइतके स्पष्ट असताना मागील चुका सुधारणे आणि एक विश्वासार्हतेचे वातावरण तयार करणे आवश्यक होते. वर उल्लेख केलेल्या विविध क्षेत्रांतील विविध समस्यांवर ठोस धोरण स्वीकारण्याची गरज निर्माण झाली आहे. तो पर्याय दिला तरच सत्तांतर घडवून आणून जनतेच्या हाती काहीतरी पडणार आहे, अन्यथा सत्तांतर घडवून काय साध्य होणार? आश्वासक दिशा कोणती आहे? १९९९ मध्ये दोन्ही काँग्रेसच्या आघाडीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले. त्यांच्या पाच वर्षांच्या कारभारानंतर पुन्हा संधी द्यायला हरकत नाही आणि विरोधकांकडे सक्षम पर्याय नव्हता, असे वातावरण होते. त्यामुळे २००४ ची निवडणूक सहज जिंकून गेले. अजूनही वेळ गेलेली नाही, एक समजदार भूमिका घेऊन विश्वासार्ह वातावरण निर्मिती केली तर महाराष्ट्राला नवी दिशा मिळू शकते.

अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. त्यात घोषणांचा पाऊस असेल, नव्या योजनांची पहाट दाखविली जाईल, आकड्यांचे गुलाबी किरणांचे आशादायक चित्र उभे केले जाईल. या सर्व अर्थसंकल्प मांडताना करायच्या राजकीय कुरघोड्याच ठरतात. वास्तव काही बदलत नाही. शिक्षण क्षेत्रातील सावळ्या गोंधळाला नवी दिशा नाही, सार्वजनिक आरोग्य आणि वाहतुकीचा अस्त होत चालला आहे, त्यावर उपाययोजना नाहीत. वाढत्या शहरीकरणातील गुंतागुंतीचे विषय सोडविण्यासाठी ठोस धोरण आणि निर्णय नाहीत. शेतीचे प्रश्न तरी या सर्वच राजकीय पक्षांना सोडविता येणार नाही, असेच वातावरण त्यांच्या भूमिकावरून स्पष्ट दिसते आहे. शेतमालाच्या भावाचा प्रश्न सुटत नाही, शेतीपूरक सेवा देणाऱ्या व्यवसायाच्या जाळ्यातून शेतीची सुटका होत नाही.

शेती करून उत्पन्न मिळत नाही. मात्र, शेतीसाठी लागणाऱ्या साधनांचा व्यापार करून प्रचंड कमाई करता येते. औषधे, खते आणि साधनांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. त्याचा लाभ त्याची विक्री करणाऱ्यांना होतो आहे. शेती सोडून देऊन पर्याय स्वीकारणे, हाच मार्ग त्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी ठेवला आहे का? असे हे चित्र दुर्दैवाने उभे राहिले आहे.

# पालिकेतील ९६४ रिक्त पदे कंत्राटावर भरण्याचा घाट




**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेत मंजूर पदांनुसार सध्या ९६४ पदे रिक्त असल्याची आरटीआय कार्यकर्ते कृष्णा गुप्ता यांनी माहिती अधिकारातून उघड केली आहे. परंतु, ती पदे कंत्राट पद्धतीवरच भरण्याचा घाट प्रशासनाकडून घातला जात आहे. ठोक मानधनासह कंत्राटावर कार्यरत कर्मचारी व कामगारांमध्ये नाराजी पसरली असून रिक्त पदांवर त्यांनाच प्राधान्याने सेवेत सामावून घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पालिकेत एकीकडे अधिकारी, कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने कामे वेळेवर होत नसल्याचा कांगावा प्रशासनाकडून केला जातो. 'ड' वर्गातील पालिकेला राज्य सरकारने विविध संवर्गातील पदे भरण्यास अनुमती दिली आहे. प्रथम वर्गात एकूण ८० पदे मंजूर असून त्यापैकी ३७ पदे अद्याप रिक्त ठेवली आहेत. यातील बहुतांश वैद्यकीय अधिकाऱ्यांची ठोक मानधनावर नियुक्ती केली जाते. त्यांना सरकारी नियमानुसार वेतन व लाभ दिले जातात. इतर काही महत्त्वाची पदे पालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांच्या प्रभारी नियुक्तीने भरली जातात. वर्ग-२ साठी एकूण ५१ पदे मंजूर असून त्यातील २८ पदे अद्यापही रिक्त आहेत. वर्ग-३ साठी एकूण ७३० पदे मंजूर असताना त्यातील २५४ पदे रिक्त ठेवली आहेत. वर्ग-४ मधील एक हजार ५८१ पदांना मंजुरी असून त्यापैकी ६४५ पदे रिक्त ठेवली आहेत.

पालिकेत संगणकचालकांची वानवा असतानाही ठोक मानधनावरील ७० संगणकचालक व लघुलेखक आपली सेवा चोखपणे बजावत आहेत. अशातच, पालिकेने २००० मध्ये सफाई कामगारांची कंत्राटी पद्धतीवर भरती केली होती. त्यावेळी राज्य सरकारने एक हजार १८० पदांना मंजुरी दिली होती. त्यापैकी पालिकेकडून केवळ ७०९ कामगारांनाच सेवेत सामावले गेले. भरलेल्या पदांवर काम करणाऱ्यांपैकी काही कामगार मृत, तर काही निवृत्त झाले असून त्यांच्या वारसदारांनाही प्रशासनाने ताटकळत ठेवल्याचे सांगण्यात येत आहे. पालिकेकडून सफाई कामगारांना सध्या कंत्राटी पद्धतीवर नियुक्त केले जात असून त्यातही राज्य सरकारच्या लाड समितीने केलेल्या शिफारशीनुसार अद्यापही सुमारे ८०० कामगार कमी पडत आहेत.

पालिकेने रिक्त पदे भरण्यासाठी सतत कंत्राटी पद्धतीचा अवलंब केला असून त्यात कंत्राटदाराचेच भले करण्याचा प्रयत्न चालवल्याचा आरोप कर्मचारी व कामगार संघटनांकडून केला जात आहे.

वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत सफाई कामगारांची संख्या पुरेशी नाही. त्यांच्या नियुक्तीबाबत पाठपुरावा सुरू असून कंत्राटावर काम करणाऱ्या कामगारांना अनुभवानुसार प्राधान्याने रिक्त पदांवर सामावून घ्यावे, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे.

# मोखाड्यात तीन वर्षांत झाले १०५ बालमृत्यू

**मोखाडा -** १९९२-९३ च्या वावर - वांगणीतील कुपोषण व भूकबळी झाल्यापासून जव्हार मोखाडा हे आदिवासी तालुके कुपोषणाच्या प्रश्नावरुन नेहमीच चर्चेत राहीले आहेत या भयाण मृत्यूकांडाची शासनाने त्यावेळेस तात्काळ दखल घेऊन जव्हार येथे जिल्हा अप्पर कार्यालय हलवण्यात आले व येथील कुपोषण व भूकबळी थांबवण्यासाठी शासनाने तात्काळ कोट्यावधी रुपयांच्या निधीची देखिल तरतूद केली. यामुळे बालमुत्यू कुपोषण कमी होईल असे वाटत होते मात्र आज जवळपास २५ वर्षाचा कालावधी उलटून ही कुपोषण व भूकबळी ची समस्या अजून संपलेली नाही.



कुपोषणाच्या बरोबरच मोखाडा तालुक्यांत बालमृत्यूचे प्रमाण ही अधिक प्रमाणात असल्याचे सरकारी आकडेवारी वरु न दिसून येते गेल्या तीन वर्षात मोखाड्यात १०५ बालमृत्यू झाल्याची धक्कादायक माहीती समोर आली आहे.

मोखाडा एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालया अंतर्गत येणाऱ्या १७८ मुळ अंगणवाडी व ५१ मिनी अंगणवाडी कार्यक्षेत्रांतर्गत एप्रिल २०१६ ते नोव्हेंबर २०१८ पर्यत २५ नवजात बालकाचे मृत्यूची नोंद शासन दरबारी असून तसेच ० ते ६ वयोगटातील ५० बालाकांचे मृत्यू झाले आहेत. सरकारी कागदोपत्री जरी १०५ बालमृत्यू झाल्याची नोंद असली तरी प्रत्येक कक्षात मात्र हा आकडा अधिक असण्याची शक्यता आहे. कुपोषण निर्मूलन व गरोदर माताच्या आहारावर कोट्यावधी रुपये खर्च होऊनही या सर्व उपाययोजनांचा पुरता फज्जा उडाल्यांचे चित्र या बालमृत्यू मुळे समोर आले आहे.

# सहा लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या मनसेच्या उपशहर अध्यक्षाला अटक

**नवी मुंबई -** झाडाच्या फांद्या छाटल्याने कारवाईची धमकी देऊन सहा लाखाची खंडणी मागणाऱ्या पनवेलच्या मनसे उपशहर अध्यक्षाला अटक करण्यात आली आहे. गेली एक महिन्यापासून तो तक्रारदाराला खंडणीसाठी धमकावत होता. अखेर गुरुवारी संध्याकाळी सापळा रचून त्याला खंडणीची रक्कम स्विकारताना अटक करण्यात आली.

मिलिंद खाडे असे पोलिसांनी अटक केलेल्या मनसे उपशहर अध्यक्षाचे नाव आहे. कामोठे येथील रहिवाशी धर्मा जोशी यांना तो एक महिन्यापासून खंडणीसाठी धमकावत होता. जोशी हे सिडकोचे निवृत्त कर्मचारी आहेत. त्यांनी घराच्या बांधकामात आड येणाऱ्या झाडाच्या फांद्या तोडल्या होत्या. याप्रकरणी पालिकेकडे तक्रार करून कारवाई टाळण्यासाठी मिलिंद खाडे याने जोशी यांच्याकडे सहा लाख रुपयांची मागणी होती. तसेच मनसे स्टाईल ने कारवाईची धमकी देत सोशल मीडियावर त्यांची बदनामी करत होता. त्यामुळे जोशी यांनी त्याच्याविरोधात गुन्हे शाखा उपायुक्त तुषार दोशी यांच्याकडे तक्रार केली .



त्यानंतर खंडणी विरोधी पथक त्याच्यावर पाळत ठेवून होते. यावेळी खाडे याने तडजोड करून साडेपाच लाख रुपये स्वीकारायची तयारी दाखवली. त्यापैकी अडीच लाखाचा पहिला हप्ता घेण्यासाठी तो कामोठे येथे येणार होता. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक योगेश वाघमारे, सहायक फौजदार शेखर तायडे, सतीश भोसले, अनिल कदम, सूर्यभान जाधव, भास्कर कुंभार, राजेंद्र सोनावणे यांनी सापळा रचला होता. यावेळी त्याठिकाणी आलेल्या खाडे याने जोशी यांच्याकडून रक्कम घेऊन चलाखीने पळ काढण्याचा प्रयत्न केला असता, सापळा रचून बसलेल्या खंडणी विरोधी पथकाने त्याला अटक केली. त्याच्याविरोधात कामोठे पोलिसठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पनवेल न्यायालयाने त्याला ११ फेब्रुवारी पर्यंतची पोलीस कोठडी दिली आहे.

# वसई, विरारमध्ये टँकरचा सुळसुळाट; गळती धोकादायक

**पारोळ :** वसई-विरार शहरात अनिधकृत टँकरचा सुळसुळाट झाला आहे. या टँकरचालकांकडून सुरक्षेच्या कुठल्याच नियमांचे पालन केले जात नसल्याने नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. गेल्या पाच वर्षांत बेदरकार टँकर चालकांकडून शहरात १०० हून अधिक मोठे अपघात झाले असून त्यात ३७ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. टँकरचालकांना गर्दीच्या वेळेत रस्त्यावर बंदी घालणारा प्रस्तावही धूळ खात पडला आहे. वसई फाटा ते वसई, नालासोपारा फाटा ते सोपारा, शिरसाड ते विरार या मार्गावर गळक्या टँकरच्या वाहतुकीमुळे सकाळी व संध्याकाळी रहदारीच्या वेळेतच हे मार्ग ओले होत असल्याने अपघाताची टांगती तलवार आजमितीला ही नागरिकांच्या मानेवर आहे.

वसई-विरार शहरात ६०० हून अधिक टँकर आहेत. एकटयद्रा नालासोपारा शहरात २५० टँकर आहेत. मात्र टँकरचालकांकडून सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जात नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्याला आळा घालावा अशी मागणी आहे.

***टँकरना बंदी घालण्याच्या प्रस्तावाचे काय झाले?***

मागील पाच वर्षांत टँकरचालकांकडून शहरात एकूण १०५ अपघात झाले आहेत. ज्यात ३७ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. याशिवाय ६८ जणांना गंभीर दुखापत होऊन त्यातील काही जणांना कायमचे अपंगत्व आले आहे. तर टँकरमधून पाणी सांडणे नित्याची बाबत आहे. मात्र पाण्याच्या वाहतुकीस सदोष टँकरचा वापर केला जातो. वाहतूक कोंडी आणि अपघातांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी टँकरना शहरात बंदी घालण्याचा प्रस्ताव तयार केला होता. या प्रस्तावानुसार सकाळी ८ ते दुपारी १ आणि संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत टँकरचालकांवर शहरात वाहतुकीसाठी बंदी घालण्यात येणार होती.



# कल्याण ग्रामीणमध्ये पाण्यासाठी वणवण

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील मलंगगड रस्त्यावरील पोसरी, चिंचवली, भाल, म्हात्रेपाडा, मलंगवाडी, वसार, द्वारली, नेवाळी परिसरातील गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पुरेसे पाणी येत नसल्याने महिलांना परिसरातील विहिरी, कूपनलिकांचा आधार घ्यावा लागत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे रहिवाशांनी सांगितले.



नेवाळी, मांगरूळ परिसरातील रहिवासी गाव परिसरातील उपलब्ध पाण्यावर भेंडी, वांगी, कारली, मुळा व इतर भाज्यांची लागवड करतात. त्यासाठी पुरेसे पाणी नसल्याने शेतक री चिंतेत आहेत. गावाच्या परिसरातून गेलेले सांडपाण्याचे नाले, गटारे अडवून ते पाणी लागवडीसाठी वापरले जात आहे. अधिकारी, लोकप्रतिनिधींना कळवूनही त्याची दखल घेतली जात नाही, अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. फेब्रुवारीपासून पाणीटंचाई भेडसावू लागल्याने पुढील तीन महिन्यांत या दुर्भिक्ष्यावर मात कशी करायची या विवंचेनत ग्रामस्थ आहेत. बहुतेक गावांमध्ये नळपाणी योजना आहे. सार्वजनिक नळकोंडाळे अनेक ठिकाणी आहेत. मात्र, पुरेशा दाबाने पाणी येत नसल्याने महिलांना नळावर रांगा लावाव्या लागत आहेत.

# गर्भपाताची औषधे विक्रणारे त्रिकुट गजाआड

**कल्याण -** गर्भपाताच्या औषधांची बेकायदा विक्री करणाऱ्या त्रिकुटाला डोंबिवली रामनगर पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून कल्पेश कदम, आशिष गुप्ता व पंकज रावळ अशी त्रिकुटाची नावे आहेत. हे तिघेही मेडिकल स्टोअरमध्ये काम करीत असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली.

डोंबिवलीमध्ये काही मेडिकल दुकानांमध्ये बेकायदा गर्भपातावरील औषधाची विक्री केली जात असल्याची माहिती रामनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयसिंग पवार यांना मिळाली. त्यानुसार शोध घेतला असता डोंबिवली पूर्वेतील राजकमल मेडिकलमध्ये काम करणाऱ्या कल्पेश कदमकडे बेकायदा साठा मिळाला. ही औषधे त्याने राजलक्ष्मी केमिस्टमध्ये काम करणारा पंकज रावल याच्याकडून मिळाल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी कल्पेश, आशिष व पंकज या तिघांना ताब्यात घेऊन १५ हजारांची औषधे जप्त केली.

# चॅनल पॅकच्या नावाखाली मराठीची मुस्कटदाबी?

**आपल्या माथी मराठी व्यतिरिक्त इतर भाषा मारून आपल्याकडून अधिक पैसे घेतले जात आहेत. या वाहिन्यांचा हा नाठाळपणा फक्त महाराष्ट्रातच आहे. इतर बहुतांशी सर्व राज्यात ते तिथल्या भाषेप्रमाणे निवडीचं स्वातंत्र्य देत आहेत.**

मग महाराष्ट्रात असं का??

कारण आपण आळस करू. हिंदी चालवून घेऊ. राष्ट्रभाषा या अंधश्रद्धेच्या आहारी जाऊ. आणि त्यांचं अनावश्यक भलं करू.

ट्रायने नवीन नियम आणले, पण त्यातून वाहिन्या क्षमराठी माणसांची कशी फसवणूक करत आहेत त्याबद्दल..

झी: एकूण मराठी वाहिन्या ४

त्यांची एकत्रित किंमत: ३१. १०

पॅकेजची किंमत: ४९ रुपये

झीच्या ४ वाहिन्यासाठी आपण मोजत आहोत ४९ रुपये. सरासरी १२.२५ रुपये.




————————————

सोनी: एकूण वाहिनी १

किंमत: ४ रुपये

सोनी पॅकेजची किंमत: ३१ रुपये

एका मराठी वाहिनीसाठी आपण देत आहोत ३१ रुपये.

इकडे आपल्याला मराठीइंग्रजी, मराठीकार्टून, क्षमराठीमाहितीपर वाहिन्या असा काहीच पर्याय नाही.

————————————

स्टार: मराठी वाहिनी १

किंमत: ९ रुपये

स्टारच्या पॅकेजची किंमत: ४९ रुपये

म्हणजे फक्त स्टार प्रवाह साठी आपण देत आहोत ४९ रुपये.

विशेष म्हणजे आपल्याला स्टारचे मराठी+क्रीडावाहीन्या, मराठी+इंग्रजी असे पर्याय उपलब्ध नाहीत.

————————————

झी मराठी: १९ रुपये

झी टॉकीज: १२ रुपये

झी युवा: ४ रुपये

झी २४ तास : १० पैसे

स्टार प्रवाह: ९ रुपये

सोनी मराठी: ४ रुपये

कलर्स मराठी: १९ रुपये

न्यूज १८ लोकमत: २५पैसे

फक्त क्षमराठी वाहिन्या निवडल्यातर ६० रुपयेच्या आत अधिकच बजेट होत. बाकी आपण आपल्या आवडीप्रमाणे इंग्रजी चित्रपट, कार्टून, क्रीडा, माहितीपर वाहिन्या घेऊ शकतो. बऱ्याच वाहिन्या फ्री-टू-एअर पण आहेत.

पण तरीही आपल्या माथी मराठी व्यतिरिक्त इतर भाषा मारून आपल्याकडून अधिक पैसे घेतले जात आहेत.

या वाहिन्यांचा हा नाठाळपणा फक्त महाराष्ट्रातच आहे. इतर बहुतांशी सर्व राज्यात ते तिथल्या भाषेप्रमाणे निवडीचं स्वातंत्र्य देत आहेत.

### पोलीसांचे आवाहनः गहाळ कागदपत्रांसाठी अर्ज द्या.. दाखल न्या

# ‘ॲफिडेव्हीट’ला आता कायमचाच रामराम

***सातारा: महत्वाची कागपत्रे हरविल्यानंतर पोलिसांकडून दाखला मिळविण्यासाठी पूर्वी ॲफिडेव्हीट करावे लागत होते. मात्र, आता ही ॲफिडेव्हीटीची कटकट कायमची बंद झाली आहे. केवळ स्वयंसाक्षांकित अर्ज दिल्यास तत्काळ गहाळ झालेल्या कागदपत्रांचा दाखला नागरिकांना मिळणार आहे. विशेष म्हणजे, याची अंमलबजावणीही सर्व पोलीस ठाण्यात तातडीने सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे आर्थिक भुर्दंडापासून नागरिकांचा बचाव झाला आहे.***

अनेकदा प्रवासामध्ये महत्वाची कागपत्रे गहाळ होत असतात. त्यामुळे पुन्हा ही कागदपत्रे काढण्यासाठी नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. ज्या हद्दीमध्ये कागपत्रे पडली असतील, त्या हद्दीतील पोलीस ठाण्यात जाऊन कागपत्रे हरविल्याची तक्रार द्यावी लागते. यासाठी प्रत्येकाला ॲफिडेव्हीट सक्तीचे करण्यात आले होते. परंतु आता ॲफिडेव्हीटची सर्व कटकट आणि धावपळ कायमस्वरुपी मिटली आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

गहाळ झालेल्या कागदपत्रांचा दाखला मिळविण्यासाठी केवळ स्वयंसाक्षांकित अर्ज दिल्यास तातडीने दाखला पोलिसांकडून दिला जाणार आहे. नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

गहाळ दाखला देण्यासाठी पोलिसांकडून प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हीट) घेण्यात यऊ नये, अशा सूचना कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी या सर्व पोलीस ठाण्यात दिल्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्या आदेशाची अंमलबजावणीही तातडीने सुरु केली आहे.

ऐरवी पोलीस ठाण्यात ॲफिडेव्हीट आणले का? असे विचारण्यात येत होते. परंतु आता त्याची गरज नसल्याचे पोलिसांकडून ऐकल्यानंतर नागरिकांना सुखद धक्का बसत आहे.

# ‘लोकसभा आणि महाराष्ट्रातील विधानसभा एकत्र होणार’

**औरंगाबाद-** आगामी लोकसभा निवडणुकीसोबत राज्यातील विधानसभा निवडणूक देखील होणार असल्याचे विधान कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांनी केले आहे. औरंगाबाद येथील सभेत चव्हाण यांनी हे विधान केले. येत्या २८ तारखेला मुख्यमंत्री विधानसभा बरखास्त करतील, असे चव्हाण यांनी सांगितले. चव्हाण यांनी यावेळी कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. चव्हाण यांच्या या वक्तव्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. गेल्या काही दिवसांपासून कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यात बैठका सुरु आहेत. दोन्ही पक्षांनी उमेदवारांची यादी देखील तयार केली आहे. केवळ बहुजन आघाडी कॉंग्रेस-राष्ट्रवादीसोबत येणार ही नाही याची वाट पाहिली जात आहे. त्यामुळे आघाडीतील दोन्ही पक्षांनी लोकसभे सोबत विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी केल्याचे दिसून येते. काही दिवसांपूर्वी भाजपने केलेल्या सर्व्हेनुसार लोकसभेसोबत जर राज्यातील विधानसभेच्या




निवडणुका घेतल्यास त्याच भाजपचा फायदा होईल असे म्हटले होते. त्यामुळे भाजप लोकसभे सोबतच राज्यात देखील निवडणुका घेऊ शकते. तीन वर्षांपूर्वी २०१६मध्ये ’नेटवर्क १८’ ला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक घेण्याची आयडिया बोलून दाखवली होती. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या निवडणुकांमधून देशाला बाहेर काढा, अशी विनंती अनेक राजकीय पक्षांनी माझ्याकडे बोलून दाखवली होती. त्यामुळे एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक एकत्र घ्यावी असा विचार आला. १० दिवसांत निवडणूक झाल्यातर पुढील पाच वर्ष कारभार सुरळीत चालेल. पण, हे एका पक्षाचे काम नाही. याला सर्व पक्षांचा पाठिंबा असायला हवाय. निवडणूक आयोगाच्या नेतृत्वाखाली सर्व पक्ष एकत्र आले तर हे शक्य होऊ शकतं, असं पंतप्रधान मोदी म्हणाले होते.



# मायावतींनी पुतळ्यांवर झालेला खर्च खिशातून परत करावा -सुप्रीम कोर्ट

**लखनऊ-** नोएडा, ग्रेटर नोएडा आणि लखनौमध्ये मायावतींनी उभारलेल्या पुतळ्यांवर खर्च झालेला पैसा त्यांनी स्वत:च्या खिशातून परत करावा असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे.

शुक्रवारी एका याचिकेवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे की, ‘जनतेचा पैसा कुठल्याही पक्षातील विशिष्ट नेत्याचे पुतळे उभारण्यासाठी खर्च केले जाऊ शकत नाहीत. आणि हत्ती हे बहुजन समाज पक्षाचं निवडणूक चिन्हं आहे’ सरन्यायाधीश रंजन गोगोई, न्यायमूर्ती दीपक गुप्ता आणि संजीव कुमार यांच्या खंडपीठानं म्हटलंय की, ’प्राथमिकदृष्ट्या आम्हाला असं वाटतं की मायावतींनी स्वत:च्या आणि पक्षाच्या निवडणूक चिन्हाचे पुतळे उभारण्यासाठी खर्च केलेला पैसा सरकारी तिजोरीला परत करायला हवा.’



२००९ मध्ये रविकांत आणि सुकुमार या दोन वकिलांनी याप्रकरणी याचिका दाखल केली होती. त्यात असं म्हटलं होतं की मायावती यांनी बसपाचे संस्थापक कांशीराम, पक्षाचं निवडणूक चिन्हं हत्ती आणि स्वत:चे पुतळे उभारण्यासाठी लोकांच्या खिशातून टॅक्सच्या रुपानं आलेले करोडो रुपये खर्च केले आहेत.

उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी २००७ ते २०१२ या काळात लखनौ आणि नोएडामध्ये दोन मोठे पार्क उभे केले. या पार्कांमध्ये मायावती यांनी बाबासाहेब आंबेडकर, बसपाचे संस्थापक कांशीराम आणि पक्षाचं निवडणूक चिन्ह हत्ती याशिवाय आणखी काही पुतळे उभे केले होते. या सगळ्या योजनांसाठी तब्बल १४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च झाल्याचा अंदाज आहे.

अंमलबजावणी संचालनालयानं सरकारी तिजोरीतील पैशाचा दुरुपयोग केल्याचा गुन्हा दाखल केला होता. दरम्यान पुतळे बनवण्यासाठीचं बजेट राज्याच्या बजेटमध्येच पारीत करण्यात आलं होतं, असं स्पष्टीकरण बसपानं २०१४ साली सुप्रीम कोर्टात दिलं होतं.

### महाराष्ट्रातील बड्या नेत्याच्या मुलीचा विनयभंग;

# शिवाजी पार्क पोलिसांनी केली अटक

**मुंबई -** महाष्ट्रातील एका प्रसिद्ध आणि बड्या राजकीय नेत्याच्या मुलीच्या नावाने फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर पोस्ट करणाऱ्यास शिवाजी पार्क पोलिसांनी अटक केली आहे. राहुल सारीपूत्रा (३१) असं या आरोपीचे नाव आहे.



मूळचा कोल्हापूरचा रहिवाशी असलेला राहुल सारीपूत्र हा ‘बीए’ पास झाला आहे. काही दिवसांपूर्वी त्याने फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर स्वतःचे तीन खाती बनवली होती. या खात्यावरून त्याने महाराष्ट्रातील एका बड्या राजकीय पक्षाचे अध्यक्षच्या मुलीला आणि तिच्या मित्रांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. राजकीय नेत्याच्या मुलीने त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारली नाही. मात्र, तिच्या मित्रांनी ती फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारली. त्यामुळेच राहुल राजकीय नेत्याच्या मुलीच्या नावाने पोस्ट करून त्या पोस्ट तिच्या मित्रांना टॅग करू लागला. इतकंच नव्हे तर त्याने तिच्या मित्रांशी राहुलने चॅट देखील केले. तसेच काही मित्रांना अप्रत्यक्ष धमक्या ही दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. याबाबत राजकीय नेत्याच्या मुलीला तिच्या मित्रांनी माहिती दिल्यानंतर तिने आपल्या कार्यकर्त्याच्या नावाने अनोळखी इसमाविरोधात शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

त्यानंतर पोलिसांनी या तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन तांत्रिक दृष्ट्या खोलवर तपास सुरू केला. त्यावेळी संबंधित फेसबुक आणि इन्स्टाग्राम अकाउंट हे कोल्हापुरातून हाताळल्याचे उघड झाले. त्यानुसार तपासाअंती पोलिसांनी कोल्हापूरहून राहुलला ७ फेब्रुवारीला बेड्या ठोकल्या. आपल्याकडून चुकून ही घटना घडल्याची कबूली राहुलने पोलिसांनी दिली. राहुलला न्यायालयात हजर केले असता त्याला १६ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.


# कर्नाटकातील सरकार पाडण्यासाठी भाजपाकडून जेडीएस आमदाराला ३५ कोटींची ऑफर

कर्नाटकातील भाजपाच्या नेत्यांनी आपल्याला ३५ कोटींची ऑफर दिल्याचा दावा जेडीएसच्या एका आमदाराने केला आहे. या दाव्यामुळे कर्नाटकात कॉंग्रेस-जेडीएसचे सरकार पाडण्यासाठी भाजपाने साम-दाम-दंड भेदची निती अवलंबल्याचे चित्र आहे.

जेडीएसचे आमदार के. श्रीनिवास गोवडा यांनी याचा खुलासा केला आहे. ते म्हणाले, भाजपाचे नेते सी. एन. अश्वथनारायण, एस. आर. विश्वनाथ आणि सी. पी. योगेश्वरा हे माझ्या कार्यालयात आले होते. भेटीदरम्यान त्यांनी मला जेडीएसमधून बाहेर पडून भाजपात येण्यासाठी ३५ कोटी रुपयांची ऑफर दिली. या सौद्यासाठी आगाऊ ५ कोटींची रक्कमही त्यांनी मला देऊ केली. मात्र, मी पक्षाशी प्रामाणिक असून गद्दारी कधीही करणार नाही असे त्यांना सुनावले.

# खुशखबर ! UPSC नापास उमेदवारांनाही नोकरी मिळणार

**नवी दिल्ली -** देशातील स्पर्धा परीक्षांमध्ये दिवसेंदिवस स्पर्धा वाढीस लागली आहे. त्यामुळे अवघ्या एका गुणांमुळे विद्यार्थ्यांचं स्वप्न धुळीस मिळाल्याचं पाहायला मिळते. अगोदर पूर्व परीक्षा, नंतर मुख्य परीक्षा आणि त्यानंतर मुलाखत देऊन यूपीएससीमध्ये अनेकजण आपलं नशिब आजमावतात. मात्र, अनेकदा मुलाखतीत निवड न झाल्यामुळे या विद्यार्थ्यांना पुन्हा पहिल्यापासून तयारी करावी लागते. पण, आता मुलाखत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्याची शक्यता आहे.




यूपीएससी बोर्डाने केंद्र सरकारकडे मुलाखतीत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना इतरत्र नोकरी देण्याची शिफारस केली आहे. ओडिशामध्ये राज्य लोकसेवा आयोगाच्या संमेलनात बोलताना युपीएससीचे चेअरमन अरविंद सक्सेना यांनी सांगितले. यूपीएससीने केंद्र सरकार आणि विविध मंत्रालयांना अशा विद्यार्थ्यांनी भरती करण्याचा प्रस्ताव दिला आहे, जे नागरी सेवा आणि इतर परीक्षांच्या मुलाखत फेरीमध्ये बाद होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचं फळ तरी त्यांना मिळेल, असे आयोगाला वाटते.

# अमेरिकेचे ‘चिनुक’ भारतीय वायुसेनेच्या ताफ्यात

**भारतीय वायुसेनेच्या ताकदीत वाढ झाली आहे, कारण अमेरिकेच्या ‘चिनुक’ हेलिकॉप्टर्सची पहिली खेप भारतात दाखल झाली आहे. गुजरातच्या मुंद्रा विमानतळावर ‘चिनुक’ हेलिकॉप्टरची पहिली-वहिली बॅच पोहोचली. लवकरच ‘चिनुक’ हेलिकॉप्टर्स भारतीय वायुसेनेच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. सियाचीन आणि लडाख अशा ठिकाणी ‘चिनुक’ हेलिकॉप्टर वायुसेनेसाठी फायदेशीर ठरणार आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये भारत सरकारने अमेरिकेकडून २२ ॲपेचे हेलिकॉप्टर्स व १५ ‘चिनुक’ हेलिकॉप्टर घेण्याचा करार केला आहे. याच वर्षी सर्व १५ हेलिकॉप्टर भारतीय वायुसेनेच्या ताफ्यात दाखल होतील अशी शक्यता वायुसेनेकडून वर्तवण्यात आली आहे.**

### काय आहे चिनुक

बोइंग सीएच-४७ चिनुक हे अमेरिकी सैन्यदलांच्या ताफ्यातील अवजड मालवाहू हेलिकॉप्टर आहे. मागे आणि पुढील अशा दोन्ही बाजूंना असलेले आणि एकमेकांच्या विरुद्ध दिशेने फिरणारे त्याचे दोन मोठे रोटर (पंखे) हे त्याचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ते सहज ओळखता येते.

अमेरिकी सैन्य दलांना १९५६ साली जुन्या सिकोर्स्की सीएच-३७ ही मालवाहू हेलिकॉप्टर बदलण्यासाठी नवे हेलिकॉप्टर हवे होते. बऱ्याच विचारविनिमयानंतर व्हटरेल मॉडेल ११४ किंवा वायएचसी-१बी नावाचे हेलिकॉप्टर स्वीकारण्याचे ठरले. या हेलिकॉप्टरचे पहिले उड्डाण २१ सप्टेंबर १९६१ रोजी झाले. व्हटरेल ही कंपनी १९६२ साली बोइंगने खरेदी केली. त्यानंतर या हेलिकॉप्टरचे नाव बोइंग सीएच-४७ ए चिनुक असे ठेवले गेले. ते ऑगस्ट १९६२ मध्ये अमेरिकी सैन्य दलांत दाखल झाले. त्यानंतर आजतागायत ४० वर्षांहून अधिक काळ ते १७ देशांच्या हवाई दलांत प्रभावीपणे कार्यरत आहे.



टॅण्डम रोटर हे बोइंग सीएच-४७ चिनुक हेलिकॉप्टरचे मुख्य वैशिष्ट्य. त्यावर दोन टोकांना दोन मोठे पंखे आहेत. ते एकमेकांच्या विरुद्ध दिशेने फिरतात. त्यामुळे एका रोटरने तयार होणारा टॉर्क दुसऱ्या रोटरने नाहीसा होतो. म्हणजेच पंख एका दिशेने फिरू लागला की हेलिकॉप्टर दुसऱ्या दिशेने गोलाकार फिरू लागते. हा परिणाम नाहीसा करण्यासाठी सामान्य हेलिकॉप्टरला शेपटाकडे लहान, उभा रोटर असतो. त्याची चिनुकमध्ये गरज नाही. त्यामुळे चिनुकला उड्डाणादरम्यान असाधारण स्थैर्य लाभते. परिणामी खराब हवामानात जिथे अन्य हेलिकॉप्टर वापरता येत नाहीत तिथे चिनुक वापरता येते.

त्याचे प्रशस्त फ्युजलाज आणि मागील भागातील विस्तृत दरवाजामुळे त्यात अवजड लष्करी वाहनेही भरून वाहून नेता येतात. त्याच्या तळाला तीन हूक असून त्याला टांगून तोफा, चिलखती वाहने, जीप आदी वाहून नेता येतात. त्याचे रिकामे असताना वजन १०,६१५ किलो तर भरल्यानंतरचे वजन २२,६८० किलो असते. ते ताशी २६९ किमी वेगाने १२०० किमी अंतराचा प्रवास करू शकते. व्हिएतनाम, अफगाणिस्तान, इराक आदी लष्करी कारवायांमध्ये त्याचा वापर करण्यात आला. अमेरिकेसह अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, इराण, ग्रीस, इटली, जपान, स्पेन आदी देशांकडे चिनुक आहेत.

# पश्चिम बंगालमध्ये तृणमूल कॉंग्रेसच्या आमदाराची गोळया झाडून हत्या

**पश्चिम बंगाल :** पश्चिम बंगालमध्ये तृणमूल कॉंग्रेसचे आमदार सत्यजीत बिश्वास यांची हत्या करण्याता आली आहे. शनिवारी रात्री गोळी घालून त्यांची हत्या करण्यात आली. बिश्वास यांच्या हत्येमुळे पश्चिम बंगालमध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, सत्यजीत यांची हत्या भाजपाच्या सांगण्यावरून झाल्याचा गंभीर आरोप तृणमूल कॉंग्रेसने केला आहे.



पश्चिम बंगालच्या नदिया जिल्ह्यात शनिवारी रात्री ही घटना घडली. सत्यजीत बिश्वास हे कृशनगर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले होते. बिश्वास हे फुलबाडी परिसरात आयोजित सरस्वती पुजेच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते. पुजा सुरू असतानाच त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्याची माहिती आहे. त्यांना तात्काळ शक्तिनगर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले होते. परंतु, त्याआधीच त्यांचा मृत्यू झाला होता, असे डॉक्टरांनी सांगितले.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)